## नि.फौ.ख.क्र.३५०/२०१५ मधील निशाणी क्र.१ खाली आदेश

## (पारीत दिनांक २६ मार्च, २०२५)

प्रकरणातील कागदपत्रांचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचे दोषारोपपत्र हे दि.२४.०४.२०१९ रोजी दाखल करण्यात आले असुन दि.१७.११.२०२१ रोजी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०९ सह १४९ आणि जिवनावश्यक वस्तु अधिनियम कलम ३ व ७ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. तदनंतर सदर प्रकरणात शेवटचा साक्षीदार क्र.१० यांची साक्ष दि.१६.०९.२०२३ रोजी नोंदविण्यात आली. तदनंतर सदरचे प्रकरण पोलिस साक्षीदार ए.पी. गवते यांच्या पुराव्याकरीता दि.०८/०४/२०२४ पासुन प्रलंबित असल्याचे दिसुन येते. तरीही, अभीयोग पक्षाने साक्ष नोंदविण्याच्या अनुशंगाने कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे दि.१३/११/२०२४ रोजी अभीयोग पक्षास पोलिस साक्षीदार ए.पी. गवते, यांना साक्षीकामी हजर करण्यासाठी शेवटची संधी देवुनही ते साक्षीदारास हजर करु शकले नाहीत.

२. प्रकरण हे ६ वर्ष जुने असुनही प्रकरणात अभियोग पक्षातर्फे कार्यवाही केली जात नाही. आजरोजी आरोपी व त्यांचे वकील हजर. करीता, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येतो. आरोपींविरुध्द अभीलेखावर पुरावा आल्याने प्रकरण आरोपींचे फौ.प्र.सं. ३१३ चे निवेदनकामी नेमण्यात येते.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.03.26 17:46:35 +0530

(एस.एन. पाटील)

दौंड. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

दि.२६/०३/२०२५ न्यायालय क्र.३, दौंड, जि. पुणे

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | M.M. Chintale |
| Court name | : | Shri. S.N. Patil<br>Judicial Magistrate F.C., Daund<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Order date | : | 26.03.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 26.03.2025 |
| Order uploaded on | : | 27.03.2025 |